मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पोलिसांचा एक दिवस शाळेसाठी उपक्रम!

## शहरातील बालगुन्हेगारी पोलिसांसमोरची मोठी समस्या

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
पोलिसांनी 'एक दिवस शाळेसाठी' हा उपक्रम हाती घेतला असून शाळेत जाऊन सायबर गुन्हेगारी, समाजमाध्यम, व्यसनाधिनता, महिला सन्मान अशा विविध विषयांवर धडे दिले जात आहेत. या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. शहरातील बालगुन्हेगारी पोलिसां समोरची मोठी समस्या आहे. बालगुन्हेगारांना कायद्याचे मोठे कवच आहे. त्यांच्यावर इतर गुन्हेगारांप्रमाणे कारवाई करता येत नसल्याने पोलीस यंत्रणा हतबल ठरत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर 'बालगुन्हेगारी' ही समस्या मुळासकट



संपवण्यासाठी पावले उचलण्यास पोलिसांनी सुरुवात केली. मागील काही महिन्यांपासून पोलीस झोपडपट्टीमध्ये जाऊन भरकटलेल्या मुलांचे समुपदेशन करू लागले आहेत. दिशा फाउंडेशनच्या वतीने झोपडपट्टीतील अल्पवयीन गुन्हेगारांसाठी रोजगार निर्मिती करण्याचे काम सुरु आहे. यातून वाम मार्गाला लागलेली मुले मुख्य प्रवाहात येतील, अशी अपेक्षा पोलिसांना आहे. मुले 'भाईगिरी'कडे वळू लागल्याने पोलिसांनी मुलांना शाळेत असतानाच कायद्याचे ज्ञान, संस्कार देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार पोलीस शाळेत जाऊन वर्ग भरवित आहेत. प्रत्येक उपविभागात एक याप्रमाणे १४ उपविभागांची पथके, वाहतूक शाखेच्या मुख्यालयातील खटला, नियोजन विभाग आणि प्रशासनाची तीन पथके, एक सहायक पोलीस आयुक्त, पोलीस उपायुक्त आणि वाहतूक यांचे प्रत्येकी एक पथक याप्रमाणे २० पथके तयार करण्यात आली आहेत.

> एक दिवस शाळा उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. १३ हजार विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचलो आहेत. विद्यार्थ्यांना पुस्तकेही वाटप करणार आहोत.
> – बापू बांगर, पोलीस उपायुक्त

या चमूच्या मदतीला काही कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. पोलीस निरीक्षक दर्जाच्या अधिकारीकडे सर्व जबाबदारी सोपवण्यात आली असून, दर गुरुवारी हा उपक्रम राबविला जात आहे. शाळा आणि पथक प्रमुखांचा एक 'व्हॉट्सॲप ग्रुप' तयार करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केल्यानंतर त्यांच्या समस्यादेखील जाणून घेतल्या जातात. त्यासाठी स्वतंत्र १५ मिनिटांचे सत्र आयोजित करण्यात येते. सत्रानंतर विद्यार्थिनी आपल्या समस्या पोलीस अधिकाऱ्यांना खासगीत सांगू शकणार आहेत. 'एक दिवस शाळेसाठी' या उपक्रमाचा अहवाल त्याच दिवशी मागवण्यात आला आहे. उपायुक्त दर्जाचे अधिकारी अहवाल तपासणी करत असून अहवालासोबत वर्ग सुरु असतानाचे दोन छायाचित्रेही द्यावे लागत आहेत. त्यामुळे केवळ शाळेला भेट देऊन वेळ मारून नेता येत नाही.

# खंडोबा मंदिरात चंपाषष्ठी उत्साहात साजरी!

## पिंपरी चिंचवड हाफ मॅरेथॉन २०२३ ही

**पिंपरी-चिंचवड**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
निगडीतील खंडोबा मंदिरात श्री खंडोबा प्रतिष्ठानच्या मार्तंड भैरव षडरोत्सवानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाची सांगता सोमवारी चंपाषष्ठीच्या कार्यक्रमाने हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत झाली. षडरोत्सवानिमित्त दररोज पहाटे काकड आरती, भजन कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. सोमवारी चंपाषष्ठी निमित्त पहाटे श्री खंडोबा आणि महादेवाच्या पिंडीला




महाअभिषेक करण्यात आला, दुपारी विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी मंडळ दापोडी यांचा भजनाचा कार्यक्रम, त्यानंतर जागरण गोंधळ तर सायंकाळी महाआरती करण्यात आली. आलेल्या सर्व भाविक भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन देवस्थानचे अध्यक्ष तानाजी काळभोर, खजिनदार जंगली महाराज काळभोर, कार्याध्यक्ष शंकरआप्पा काळभोर, सचिव भाऊसाहेब काळभोर, विश्वस्त दीपक काळभोर, पोलिस अधिकारी रणजित सावंत, तेजस्विनी कदम, राजेंद्र बहिरट, राजेंद्र बोरसे तसेच देहु देवस्थानचे विश्वस्त सुनिल महाराज मोरे, राजेंद्र महाराज मोरे, अमोल महाराज मोरे, उद्योजक जयदीप खापरे, रोहीदास गाडे, निखिल देरेकर, विजय तारक, माजी नगरसेविका सुमन पवळे, शर्मिला बाबर, कमल घोलप, अश्विनी बोबडे, माजी नगरसेवक शांताराम भालेकर, पंकज भालेकर, हिरामण येळवंडे आदी उपस्थित होते. भानुदास काळभोर, शंकर पा. काळभोर, दत्तात्रय पा. काळभोर, संभाजी काळभोर, अजय काळभोर, सुशांत मोहिते, विशाल मडके, इंद्रसिंग राजपूत, बबन जीवना, वैभव कुऱ्हाडे, विश्वास थोरात, सतिश झेंडे, योगेश काळभोर, अमोल काळभोर, हनुमंत रेवी, स्वातीताई इंजे, संस्कृती सुधीर ढगे, मार्तंड रेवी, प्रेमा रेवी, संदिप केंदळे यांनी केले.

# सोयी सुविधा न दिल्याबद्दल बिल्डर विरोधात गुन्हा दाखल

**मोशी**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**
सोसायटी स्थापने आधीचे लाईट बिल , पाणी बिल न भरता सोसायटी धारकांना पार्किंग ही दिले नाही, असा आरोप करत पोलीस ठाण्यामध्ये स्वप्नलोक हाउसिंग सोसायटी, मोशी मधील रहिवाश्यांनी बिल्डर विरोधात गुन्हा दाखल केला आहे. हा सर्व प्रकार २६ डिसेंबर २०१५ पासून आज अखेर पर्यंत घडला आहे. याप्रकरणी ईश्वर भगवान रासकर (वय ५३, मोशी) यांनी भोसरी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरून ट्युलीप प्रॉपर्टीज ,मोशी, अक्रम झाहील उल्ला चौधरी, भरत लालाराम चौधरी, बाबुलाल पूनाराम (रा.मोरवाडी) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, स्वप्नलोक डेव्हलपर्स यांनी फिर्यादी व सोसायटी येथील रहिवाश्यांना कोणताही हिशोब दिला नाही. तसेच सोसायटी स्थापने आधीचे वीजबिल,पाणी बिल भरले नाही, तसेच सुख सुविधा दिल्या नाहीत, पार्किंग दिली नाही केवळ आमिष दाखवून ग्राहकांची फसवणूक केली. यावरून एमआयडीसी भोसरी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# पवना नदीच्या प्रदूषणमुक्तीसाठी उद्यापासून पवनामाई जलदिंडी!

## भक्ती-शक्ती उद्यानापासून दिंडीचे प्रस्थान

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** शहरातून वाहणाऱ्या पवना नदी प्रदूषणमुक्तीसाठी जलदिंडी प्रतिष्ठानातर्फे बुधवारपासून पवनामाई जलदिंडी काढली जाणार आहे. निगडीतील भक्ती-शक्ती उद्यानापासून बुधवारी सकाळी साडेदहा वाजता दिंडीचे प्रस्थान होईल. पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी आणि मुळा नदीच्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झाला आहे. पवना नदीची महापालिका हद्दीतील लांबी २४.३४ किलोमीटर, इंद्रायणी नदीची एकूण लांबी २०.८५ किलोमीटर आहे. तर, मुळा नदी शहराच्या सीमेवरून दहा किलोमीटर अंतर वाहते.



नदीच्या प्रदूषणाबाबत लोकप्रतिनिधींनी विधिमंडळात आवाज उठविला आहे. आता नदीप्रेमीदेखील आक्रमक झाले होते. मागील अकरा वर्षांपासून जलदिंडी काढली जाते. यंदाच्या दिंडीला बुधवारपासून सुरुवात होणार आहे. पवनानगर येथे नदीपूजन करून दिंडीला प्रारंभ होईल. शिवली घाट, आर्डव घाट, थुगाव घाट, जलपूजन आणि त्यानंतर ग्रामस्थ व शाळा भेट होईल. शिवणे घाट, बेबडओहोळ किंवा सोमाटणे घाट, साळुंब्रे घाट, गुरुवारी साळुंब्रे ग्रामप्रबोधिनीमध्ये सभा, जलदिंडी आढावा घेतला जाणार आहे. साळुंब्रे घाट येथून दिंडी मार्गस्थ होणार आहे. चिंचवड येथे जलमैत्री व पर्यावरण पुरस्कार वितरण आणि दिंडीचा समारोप होणार आहे.

# कोरियन तरुणीसोबत गैरवर्तन; तरुणाला अटक



**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** कोरियन ब्लॉगर तरुणीशी गैरवर्तन केल्याचा एक (झळाऑिळ) व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल होत आहे . एका तरुणाने गैरवर्तन केल्यानंतर कोरियन तरुणीने तेथून पळ काढल्याचे व्हिडीओत आढळून आले. हा व्हिडिओ पिंपरी-चिंचवडमधील असल्याचं समोर आलं आहे. याप्रकरणी पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या गुंडाविरोधी पथकाने त्या तरुणाला ताब्यात घेतलं आहे. तरुणीने तिच्या युट्यूब चॅनेलवर एक व्हिडिओ पोस्ट केला होता. तिचे १.६९ लाखाहून अधिक फॉलोवर्स आहेत. ती पर्यटनासाठी भारतात आली आहे. ही तरुणी रस्त्यावर फिरत असताना काही स्थानिक लोकांबद्दल माहिती गोळा करत होती. त्याचवेळी एका दुकानापाशी आल्यानंतर तिने लोकांची विचारपूस करत असतानाच एक तरुण अचानक समोर आला आणि फोटो काढण्याच्या बहाण्याने तरुणाने तिच्या खांद्यावर हात टाकला व त्यानंतर गळ्यातदेखील हात टाकला. या घटनेचा व्हिडिओ सोशल मिडियावर प्रसारित झाला आहे. संबंधित व्हिडीओत तरुण मराठीत बोलत आहे. हा व्हिडिओ पिंपरी- चिंचवडमधील रावेत भागातील असल्याचे समोर आल्यानंतर पिंपरी-चिंचवडच्या गुंडाविरोधी पथकाने तपास करत गैरवर्तन करणाऱ्या तरुणाला ताब्यात घेतलं आहे.

# प्राचार्य डॉ. वसंत चाबुकस्वार यांना 'फेलो महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस २०२३' चा पुरस्कार!

## चाबुकस्वार यांनी शैक्षणिक क्षेत्रात विज्ञान व तंत्रज्ञानाला अनुसरून संशोधन कार्य केले

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्स्प्रेस मराठी।** 'महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्स' ही संस्था गेली ४० वर्षापासून विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात संशोधनाचे सर्वोत्तम कार्य करीत आहे. १९७६ साली या संस्थेची स्थापना झाली. महाराष्ट्रामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान या विषयांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देणारी संस्था म्हणून या संस्थेचा नावलौकिक आहे.




या संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी 'फेलो महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस' या नावाने पुरस्कार दिला जातो. यावर्षी' यांमध्ये मॉडर्न एज्युकेशन सोसायटीच्या नौरोसजी वाडिया कॉलेजचे प्राचार्य डॉ. वसंत चाबुकस्वार यांना 'फेलो महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस २०२३' चा पुरस्कार नुकताच प्राप्त झाला.

गेली अनेक वर्षापासून प्राचार्य डॉ. वसंत चाबुकस्वार यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर तसेच सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात विज्ञान व तंत्रज्ञानाला अनुसरून संशोधन कार्य केलेले आहे. त्यांचे चार पेटंट तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर ६० च्यावर नामांकित जर्नलमध्ये संशोधन पेपर प्रसिद्ध झालेले आहेत. त्यांना पद्मश्री डॉ. जी. डी. यादव यांच्याकडून 'फेलो महाराष्ट्र अकॅडमी ऑफ सायन्सेस २०२३' चा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच या कार्यक्रमात भौतिकशास्त्राचे प्रा. डॉ. संभाजी वारूळे यांना देखील 'यंग फेलो' म्हणून पुरस्कृत करण्यात आले. प्राचार्य डॉ. वसंत चाबुकस्वार व डॉ. संभाजी वारूळे यांना संशोधनाच्या संपूर्ण वाटचालीमध्ये मॉडर्न एज्युकेशन सोसायटीचे विश्वस्त प्रा. सचिन सानप, विश्वस्त डॉ. अशोक चांडक, सीएफओ श्री गणेशन आणि वाडिया कुटुंबीय यांचे मोलाचे योगदान लाभले.

सदर कार्यक्रम संत ज्ञानेश्वर हॉल एम. आय. टी. वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी कॅम्पस, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. ह्या कार्यक्रमांमध्ये डॉ. विश्वनाथ कराड ह्यांनाही सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. गौतम बापट, डॉ. भरत काळे आदी सहभागी झाले होते.

# पीएमआरडीए गृहप्रकल्पात दिरंगाई!

## मुख्यमंत्री शिंदे यांनी दिली विधिमंडळात कबुली

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) वाल्हेकरवाडी येथे उभारण्यात येणाऱ्या गृहप्रकल्पामध्ये दिरंगाई झाली आहे. खासगी विकसकाला चार वेळा मुदतवाढ देण्यात आली. प्रकल्पाचे काम अपूर्ण असतानाही विलंबामुळे वसूल करण्यात आलेल्या दंडातील रकमेतही सवलत देण्यात आली असल्याची कबुली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधिमंडळात दिली. पीएमआरडीएकडून चिंचवड येथील वाल्हेकरवाडी परिसरात आर्थिक दुर्बल आणि कमी उत्पन्न गटातील घटकांसाठी सन २०१६ पासून ७६० सदनिकांचा गृहप्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाला चार वेळा मुदवाढ देऊनही अद्याप प्रकल्प पूर्ण नसून भाववाढीच्या नावाखाली प्रकल्पाची किंमत वाढवून मागणी होत आहे. संबंधिताकडून दिरंगाईचा वसूल केलेला दंडदेखील माफ करण्यात आला आहे. चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप यांनी हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना मुख्यमंत्री शिंदे यांनी ही माहिती दिली. मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, पीएमआरडीएच्या या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया मागवून संबंधित प्रकल्प सन २०१६ मध्ये एका खासगी कंपनीला ४२ महिन्यांच्या मुदतीवर देण्यात आला होता. मात्र, सन २०१९ मध्ये करोना प्रादुर्भाव, टाळेबंदी, बांधकाम साहित्य, मजूर इत्यादींची कमतरता तसेच प्रकल्पाच्या काही भागात काही मिळकतधारकांनी केलेले अतिक्रमण आदी कारणांमुळे गृहप्रकल्पाचे काम मुदतीमध्ये पूर्ण करण्यास कंत्राटदाराला अडचणी आल्या. त्यामुळे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी चार वेळा मुदतवाढ देण्यात आली. मात्र निविदेतील अटी शर्तीनुसार देय भाववाढ गोठवून एक कोटी ६१ लाख रुपये दंड आकारण्यात आला. मधल्या काळात बांधकाम साहित्य आणि कच्च्या मालात झालेली भाववाढ, वाढती महागाईमुळे भाववाढ मिळण्याबाबत कंत्राटदाराने कार्यालयाकडे विनंत केली होती. त्यानुसार कामाची गती पाहता कंत्राटदाराला करोना प्रादुर्भाव आणि इतर विचार लक्षात घेऊन ५८.७० लाख रुपये दंडाची रक्कम परत केली गेली. तसेच भाववाढ निर्देशांकानुसार १६ कोटी कंत्राटदारास पीएमआरडीएने अदा केले आहेत. कंत्राटदाराने वसूल दंडातील उर्वरित रक्कम आणि भाववाढ मिळण्याबाबत विनंती केली आहे, मात्र पीएमआरडीएने त्याला मान्यता दिलेली नाही. प्रकल्पात पाणीपुरवठा, विद्युतपुरवठा आदी अपूर्ण सुविधा पूर्ण करून डिसेंबर २०२३ अखेरपर्यंत लाभार्थ्यांना ताबा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे, असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी स्पष्ट केले. पीएमआरडीएकडून चिंचवड येथील वाल्हेकरवाडी परिसरात आर्थिक दुर्बल आणि कमी उत्पन्न गटातील घटकांसाठी सन २०१६ पासून ७६० सदनिकांचा गृहप्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पाला चार वेळा मुदवाढ देऊनही अद्याप प्रकल्प पूर्ण नसून भाववाढीच्या नावाखाली प्रकल्पाची किंमत वाढवून मागणी होत आहे. संबंधिताकडून दिरंगाईचा वसूल केलेला दंडदेखील माफ करण्यात आला आहे. चिंचवडच्या आमदार अश्विनी जगताप यांनी हिवाळी अधिवेशनात तारांकित प्रश्न उपस्थित केला होता.



### भाववाढ मिळण्याबाबत विनंती

**» पीएमआरडीएच्या या प्रकल्पासाठी निविदा प्रक्रिया मागवून संबंधित प्रकल्प सन २०१६ मध्ये एका खासगी कंपनीला ४२ महिन्यांच्या मुदतीवर देण्यात आला होता. मात्र, सन २०१९ मध्ये करोना प्रादुर्भाव, टाळेबंदी, बांधकाम साहित्य, मजूर इत्यादींची कमतरता तसेच प्रकल्पाच्या काही भागात काही मिळकतधारकांनी केलेले अतिक्रमण आदी कारणांमुळे गृहप्रकल्पाचे काम मुदतीमध्ये पूर्ण करण्यास कंत्राटदाराला अडचणी आल्या. मात्र निविदेतील अटी शर्तींनुसार देय भाववाढ गोठवून एक कोटी ६१ लाख रुपये दंड आकारण्यात आला. मधल्या काळात बांधकाम साहित्य आणि कच्च्या मालात झालेली भाववाढ, वाढती महागाईमुळे भाववाढ मिळण्याबाबत कंत्राटदाराने कार्यालयाकडे विनंती केली होती.**

# निवडणूक कामासाठी २४ तासांत हजर व्हा!

## अन्यथा गुन्हे दाखल करू : विभागीय आयुक्त

**पुणे। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकांकडून आगामी लोकसभा निवडणुकीच्या कामकाजासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. दोनवेळा नोटीस बजावूनही त्याला साधे उत्तरही देण्यात आलेले नाही, अशा ५४२ जणांनी पुढील २४ तासांत निवडणूक कामासाठी हजर न झाल्यास संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचा इशारा विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी मंगळवारी दिला. हे ५४२ अधिकारी, कर्मचारी पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिकांमधील आहेत. नव्या वर्षाच्या सुरुवातीलाच लोकसभा निवडणूक होणार आहे. या पार्श्वभूमीवर विभागीय आयुक्त राव यांनी मंगळवारी जिल्हा निवडणूक शाखेच्या कामकाजाचा आढावा घेतला. या बैठकीत पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि इतर शासकीय खात्यांमधील ५४२ अधिकारी, कर्मचाऱ्यांची 'मतदान केंद्रस्तरीय अधिकारी' (बीएलओ) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



याबाबत वारंवार पत्र, नोटीस पाठविण्यात आली. मात्र, पुणे, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून साधे उत्तरही प्राप्त झालेले नाही, असे सांगण्यात आले. त्यावर पुढील २४ तासांत संबंधित कर्मचारी निवडणूक कामासाठी हजर न झाल्यास संबंधितांवर लोकप्रतिनिधित्व कायद्यानुसार गुन्हे दाखल करावेत, असे आदेश विभागीय आयुक्त राव यांनी जिल्हा प्रशासनाला दिले. याबाबत बोलताना उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर म्हणाल्या, केंद्रीय निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार मतदार यादी अद्ययावतीकरण, मतदार नोंदणी, मतदान केंद्र तेथील सुविधा, मतदार यंत्र निश्चिती आदींचे नियोजन करण्यात येत आहे. अद्ययावतीकरण करण्यासाठी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे. जिल्ह्यात पुणे, बारामती, शिरूर आणि मावळ असे चार लोकसभा मतदारसंघ असून त्यासाठी २१ विधानसभा मतदारसंघनिहाय ८२१३ मतदान केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. प्रत्येक मतदान केंद्रावर एक बीएलओ नियुक्त करण्यात येतो. यासाठी प्रामुख्याने महापालिकेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, लिपिक यांची बीएलओ म्हणून नेमणूक केली जाते. वारंवार पत्र, नोटीस बजावूनही अद्याप ५४२ कर्मचारी निवडणूक कामासाठी हजर झालेले नाहीत. विभागीय आयुक्त यांनी २४ तासांत हजर न झाल्यास कायद्यातील तरतुदीनुसार थेट गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले.

# बेकायदा दस्त नोंदणी करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर नव्या वर्षात कारवाई!

## महसूल मंत्र्यांची विधिमंडळात माहिती



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** राज्यभरात महारेरा आणि तुकडेबंदी कायद्यांचे उल्लंघन केल्याप्रकरणी सन २०२० ते २०२२ या तीन वर्षांच्या कालावधीतील नोंदणी झालेल्या सर्व दस्तांची तपासणी करण्यात येत आहे. हा अहवाल नव्या वर्षात फेब्रुवारीच्या सुमारास राज्य शासनाला प्राप्त होईल. त्यानंतर बेकायदा दस्त नोंदणी करणाऱ्या संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, अशी ग्वाही महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विधिमंडळात दिली.राज्यात सन २०२० ते २०२२ या कालावधीत महारेरा आणि तुकडेबंदी कायद्यांचे उल्लंघन करून दस्त नोंदणी केल्याबाबत वडगाव शेरीचे आमदार सुनिल टिंगरे यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्याला उत्तर देताना महसूल मंत्री विखे पाटील यांनी ही माहिती दिली. ते म्हणाले, शासनाच्या सूचनेनुसार नोंदणी महानिरीक्षकांनी नोंदणी उप महानिरीक्षकांच्या अधिनस्त सर्व दुय्यम निबंधक कार्यालयात सन २०२० ते २०२२ या तीन वर्षांच्या कालावधीतील नोंदणी झालेल्या सर्व दस्तांची तपासणी करण्याबाबत ८ फेब्रुवारी रोजी पत्राने कळविले आहे. ही तपासणी नोंदणी अधिनियम १९६१ च्या नियम ४४ (आय) मधील तरतुदींच्या अनुपालनाच्या अनुषंगानेच न करता सर्वंकष तपासणी एक वर्षाच्या आत पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे कळविले आहे. तपासणी पथकाकडून आतापर्यंत सहा लाख २० हजार ९२ दस्तांची तपासणी करण्यात आली आहे. उर्वरित दस्तांची तपासणी कालबद्ध पद्धतीने करण्यात येत आहे. तपासणी करण्यात आलेले आक्षेप अंतिम करण्याची कार्यवाही संबंधित सहजिल्हा निबंधक आणि नोंदणी उपमहानिरीक्षक स्तरावर सुरू आहे, असे नोंदणी महानिरीक्षक यांनी कळविले आहे. दरम्यान, नोंदणी महानिरीक्षक कार्यालया कडून तपासणीचा अंतिम अहवाल शासनाला प्राप्त झाल्यानंतर अहवालात नमूद बाबींच्या अनुषंगाने आवश्यकता आणि प्रकरणानुसार संबंधितांवर नोंदणी अधिनियम, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमाच्या तरतुदींनुसार कारवाई करण्यात येईल, असेही महसूल मंत्री विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

### सर्व दस्तांची तपासणी

» शासनाच्या सूचनेनुसार नोंदणी महानिरीक्षकांनी नोंदणी उपमहानिरीक्षकांच्या अधिनस्त सर्व दुय्यम निबंधक कार्यालयात सन २०२० ते २०२२ या तीन वर्षांच्या कालावधीतील नोंदणी झालेल्या सर्व दस्तांची तपासणी करण्याबाबत ८ फेब्रुवारी रोजी पत्राने कळविले आहे. ही तपासणी नोंदणी अधिनियम १९६१ च्या नियम ४४ (आय) मधील तरतुदींच्या अनुपालनाच्या अनुषंगानेच न करता सर्वंकष तपासणी एक वर्षाच्या आत पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे कळविले आहे. तपासणी पथकाकडून आतापर्यंत सहा लाख २० हजार ९२ दस्तांची तपासणी करण्यात आली आहे. उर्वरित दस्तांची तपासणी कालबद्ध पद्धतीने करण्यात येत आहे. तपासणी करण्यात आलेले आक्षेप अंतिम करण्याची कार्यवाही संबंधित सहजिल्हा निबंधक आणि नोंदणी उपमहानिरीक्षक स्तरावर सुरू आहे, असे नोंदणी महानिरीक्षक यांनी कळविले आहे.

# दोन लाख पुणेकरांना वाढीव प्रॉपर्टी टॅक्स

## ज्या मिळकतधारकांनी अर्ज केले नाहीत, त्यांना वाढीव देयके पाठविण्यात येणार

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** मिळकतकरातील ४० टक्क्यांची सवलतीसाठी दोन लाख मिळकतधारकांनी अर्ज न केल्याने या मिळकतधारकांना वाढीव देयके पाठविण्यात येणार आहेत. त्यातून ५० कोटींचे उत्पन्न मिळेल, असा कर आकारणी आणि कर संकलन विभागाचा अंदाज आहे. दरम्यान, यापुढे सवलतीसाठी अर्ज दाखल करणाऱ्या मिळकतधारकांना पुढील आर्थिक वर्षापासून म्हणजे १ एप्रिल २०२४ पासून सवलत देण्यात येणार आहे. शहरातील निवासी मिळकतींना वर्षानुवर्षे मिळणारी ४० टक्क्यांची सवलत १ एप्रिल २०२३ पासून रद्द करण्याचा निर्णय महापालिका




प्रशासनाने घेतला होता. त्याचे तीव्र पडसाद शहरात उमटल्यानंतर चालू आर्थिक वर्षापासून ही सवलत कायम ठेवण्याचा प्रस्ताव राज्य शासनाला पाठविण्यात आला होता. मंत्रीमंडळ आणि विधानसभेतही त्याला मंजुरी देण्यात आली. त्यामुळे ज्या मिळकत धारकांना वाढीव देयकांची नोटीस पाठविण्यात आली आहे आणि ज्यांनी थकबाकीसह वाढीव मिळकतकर भरला आहे, अशा सव्वातीन लाखांहून अधिक मिळकत धारकांसाठी योजना राबविण्यात आली होती. या योजनेची मुदत ३० नोव्हेंबर रोजी संपुष्टात आली. सव्वातीन लाखांपैकी एक लाख मिळकतधारकांनी सवलतीसाठी अर्ज केले होते. त्यांना चार समान हप्त्यामध्ये वाढीव रक्कम समायोजित करण्यात येणार आहे. दरम्यान, ज्या मिळकतधारकांनी अर्ज केले नाहीत, त्यांना वाढीव देयके पाठविण्यात येणार आहेत.